जनसंपर्क कक्ष
वाजी विद्यापीठ, कोल्हापूर

17 NOV 2021
पुढारी

# महाविद्यालयात डेमॉक्रसी क्लब सुरु व्हावेत : देशपांडे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लोकशाही प्रक्रियेत युवकांचा सहभाग वाढणे आवश्यक आहे, महाविद्यालयात डेमॉक्रसी क्लब, स्टुडंट पार्लमेंट यासारखे यासारखे उपक्रम राबवले जावेत अशी अपेक्षा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी व्यक्त केली. देशपांडे यांनी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट देऊन विद्यापीठातील निवडक अधिकारी व प्राचार्य यांच्यासमवेत चर्चा केली. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी.टी.शिर्के,जिल्हाधिकारी राहूल रेखावार प्रमुख उपस्थीत होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित बैठकीत उपस्थितांसमवेत राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील आदी.**

यावेळी देशपांडे म्हणाले, मतदार जागृती आणि मतदार नोंदणी या पलिकडे जाऊन लोकशाही प्रक्रियेचा भविष्यवेधी विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. विद्यार्थ्यांनी केवळ मतदाता म्हणून नव्हे, तर लोकशाही प्रक्रियेतील एक सजग घटक म्हणून आपले कर्तव्य बजावण्यास सिद्ध व्हावे. सामाजिक सेवाकार्यात त्यांचा वैयक्तिक सहभाग आणि योगदानाने विद्यार्थी अधिक जोमाने लोकशाहीविषयक कार्यात सहभागी होतील. त्यांच्यासाठी लोकशाही आणि सुशासन, निवडणूक प्रक्रिया आदी विषयांवर एक अथवा दोन क्रेडिटचे अभ्यासक्रम राबविल्यास त्याचाही लाभ होईल. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी, राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी कल्याण विभाग यांनी जिल्हा प्रशासनाचे सहकार्य व मार्गदर्शन घेऊन निवडणूकविषयक कार्य करावे. महाविद्यालये आणि त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावे यांची सांगड घालून त्या विभागात मतदार नोंदणीचा कार्यक्रम अधिक कार्यक्षमपणाने राबविणे शक्य आहे, असे सांगितले.

बैठकीला प्र कुलगुरु डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, यांसह अधिकारी उपस्थीत होते.

सकाळ

# लोकशाहीत युवकांचा सहभाग वाढणे आवश्यक

## देशपांडे; शिवाजी विद्यापीठात प्राचार्यांबरोबर चर्चा

**कोल्हापूर, ता. १६ :** लोकशाही प्रक्रियेत युवकांचा सहभाग वाढणे आवश्यक आहे, त्या दृष्टीने महाविद्यालये आणि विद्यापीठे यांचे सहकार्य मोठ्या प्रमाणात अभिप्रेत आहे, असे प्रतिपादन राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी आज येथे केले. श्री. देशपांडे यांनी सायंकाळी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट देऊन निवडक अधिकारी व प्राचार्यांबरोबर चर्चा केली.

त्यांना युवकांचा निवडणूक प्रक्रियेतील सहभाग वाढविण्याविषयी विविध सूचना व प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन केले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

श्री. देशपांडे म्हणाले, 'आपण मतदार जागृती आणि विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी या पलिकडे जाऊन लोकशाही प्रक्रियेचा भविष्यवेधी विचार करावा. विद्यार्थ्यांनी केवळ मतदाता म्हणून नव्हे, तर लोकशाही प्रक्रियेतील सजग घटक म्हणून कर्तव्य बजावावे. या दृष्टीने त्यांचा प्रक्रियेत सहभाग होणे महत्त्वाचे आहे. पुणे येथे 'लोकशाही गप्पा' नावाचा उपक्रम राबविण्यास सुरवात झाली आहे. त्यात अनेक नामवंतांचा सहभाग असतो. त्याचप्रमाणे 'लोकशाही मूल्ये आणि शिक्षकांची भूमिका' यासारख्या विषयांवर विशेष परिसंवाद आयोजित केले. शंभर प्रथितयश मान्यवरांचा एक थिंक टँक निर्माण करून त्यांच्याकरवी विचारमंथनातून अनेक सूचना सामोऱ्या येतात. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, 'लोकशाहीच्या समृद्धी व विकासामध्ये युवा वर्गाचा सहभाग वाढविण्यासाठी विविध अभ्यासक्रमांसह लोकशाहीविषयक ऑनलाईन अभ्यासक्रम आणि प्रमाणपत्राधारित उपक्रम राबविण्यास प्राधान्य आवश्यक आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, जिल्हाधिकारी राहुल रेखावार, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर.व्ही. गुरव, राज्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. रविंद्र भणगे, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक अभय जायभाये, अधिकारी, प्रशासकीय सेवक आदी उपस्थित होते.

पुढारी

# 'ॲस्ट्रोटर्फ'च्या २५ टक्के खर्चास मान्यता

## व्यवस्थापन परिषद बैठकीत निर्णय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ तयार करण्यात येणाऱ्या 'ॲस्ट्रोटर्फ'च्या २५ टक्के खर्चास व्यवस्थापन परिषद बैठकीत मान्यता देण्यात आली.

व्यवस्थापन परिषदेची कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी बैठक झाली. यात विविध विषयांवर चर्चा होऊन मान्यता देण्यात आली. विद्यापीठातील संघटनांना कार्यालयासाठी जागा देण्यासाठीच्या विषयावर चर्चा झाली. विविध अभ्यासक्रम आणि विषयांना मान्यता देण्यात आली. युवा महोत्सवात प्रतिनिधीत्व आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना पाच टक्के प्रवेश जागा देण्यास मान्यता देण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्यासह व्यवस्थापन परिषद सदस्य उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठातून...

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात डिजिटल पत्रकारिता कोर्सला प्रवेश सुरु

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनच्या वतीने सुरू असलेल्या पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. डिजिटल माध्यमात करिअर करण्यासाठी हा कोर्स अत्यंत उपयुक्त आहे.

कोणत्याही शाखेची पदवी असेल तर या कोर्सला प्रवेश घेता येतो. शिवाय अन्य कोणताही कोर्स करत असताना, तसेच नोकरी करत असतानासुद्धा या कोर्सला प्रवेश घेता येतो. केवळ शनिवार आणि रविवारी विद्यापीठात या कोर्सचे प्रशिक्षण दिले जाते. यू ट्यूब, फेसबुक, वेब पोर्टल, फोटोग्राफी, डिजिटल मार्केटिंग, कॅमेरा हाताळणी, व्हिडीओ एडिटिंग, डिजिटल माध्यमासाठी बातमी लेखन, संहिता लेखन, अँकरिंग, सोशल मीडिया कायदे अशा अनेक अंगांनी या कोर्समध्ये प्रशिक्षण दिले जाते. प्रॅक्टिकलवर आधारलेल्या आणि पूर्णतः डिजिटल मीडियाचे प्रशिक्षण देणारा विद्यापीठातील हा एकमेव कोर्स आहे.

या कोर्सला प्रवेश घेण्यासाठी कोर्सचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव (मो. ९८८११९१२२९) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

तरुण भारत

# हॉकीच्या नवीन ॲस्ट्रोटर्फच्या २५ टक्के खर्चाला मान्यता

- शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत निर्णय

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात हॉकीचा ॲस्ट्रोटर्फ तयार करण्यासाठी शासन ७५ टक्के तर विद्यापीठाकडून २५ टक्के खर्च करण्यास मान्यता देण्यात आली. हा निर्णय शिवाजी विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत घेण्यात आला. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. तर सचिवपदी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

विद्यापीठात हॉकी ॲस्ट्रोटर्फ व्हावा यासाठी शासनाला प्रस्ताव पाठवला होता. या प्रस्तावाला शासनाने मंजूरी देत ७५ टक्के खर्च देण्याचे मंजूर केले आहे. या अत्याधुनिक हॉकीचा ॲस्ट्रोटर्फ तयार करण्यासाठी विद्यापीठाकडून २५ टक्के खर्च करण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे कोल्हापुरातील हॉकीप्रेमींना दिलासा मिळणार आहे. विद्यापीठ कर्मचाऱ्यांच्या संघटनांना विद्यापीठातील एक जागा ठरवून द्यावी अशी मागणी होती. यावर व्यवस्थापन परिषद सदस्य अमित कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने मांडलेल्या जागेसंदर्भातील ठरावाला मान्यता दिली. परंतू कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी कार्यालय थाटता येणार नाही, असाही निर्णय घेतला. तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय युवा महोत्सवात नाविन्य मिळवलेल्या ५ टक्के विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास मान्यता दिली. यासह शासकीय व शैक्षणिक अनेक विषयावर चर्चा करून मान्यता देण्यात आली.